MHPU200011902023

| | | | |
|---|---|---|---|
| दाखल तारीख | २८/०४/२०२३ | | |
| नोंदणी तारीख | २८/०४/२०२३ | | |
| निकाल तारीख | ०२/०७/२०२६ | | |
| कालावधी | वर्ष | महिने | दिवस |
| | ०३ | ०२ | ०४ |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,न्यायालय क्रं. १, घोडनदी, ता. शिरुर, जि. पुणे यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी संजय दि. वानखेडे)**

**म.कौ. हिं. सं. अर्ज क्र. १७/२०२३**
**निशाणी क्र. १४.**

१. **सौ. राधिका राजेंद्र कांबळे**
व.व.२८, धंदा – काही नाही,

२. **कु. पुष्पराज रविंद्र कांबळे**
व.व.०७, धंदा –शिक्षण,

३. **कु. चेतन रविंद्र कांबळे**
व.व. ०५, धंदा – शिक्षण,
अर्जदार क्र. २ व ३ सज्ञान सबब अ.पा.क.
जनक आई अर्जदार क्र.१
सर्व रा. द्वारा – श्रीमती कल्पना वेताळ,
न्हावरे, ता. शिरुर, जि. पुणे. **अर्जदार...**

**विरुद्ध**

१. **श्री. रविंद्र संजय कांबळे**
व.व.२९, धंदा –शेती,

२. **सौ. शोभा संजय कांबळे**
व.व. ४९, धंदा – शेती,

३. **श्री. रमेश संजय कांबळे**

व.व. २७, धंदा – शेती,

४. **श्री. पंढरीनाथ म्हस्कु शिंदे**

व.व. सज्ञान, धंदा – शेती,

५. **सौ. नर्मदा पंढरीनाथ शिंदे**

व.व. सज्ञान, धंदा – शेती,

६. **श्री. संजय पंढरीनाथ शिंदे**

व.व. सज्ञान, धंदा – शेती,

७. **सौ. नंदा संजय शिंदे**

व.व. सज्ञान, धंदा – शेती,

८. **सौ. कोमल संजय शिंदे**

व.व. सज्ञान, धंदा – शेती,

सर्व रा. टाकळीभिमा, ता. शिरुर, जि. पुणे. **जाबदेणार...**

**कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२, १७, १९, २०, २२ व २३ अन्वये अर्ज.**

---

अर्जदार तर्फे विधीज्ञ – श्री. साहेबराव बी जाधव
जाबदेणार क्र. १ ते ८ – एकतर्फा

---

**–: न्यायनिर्णय :–**

**(घोषित दि. ०२/०७/२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ (संक्षिप्ततेकरिता 'संरक्षण कायदा' असे संबोधले आहे.) चे कलम १२, १७, १९, २०, २२ व २३ प्रमाणे दाखल केलेला आहे.

## अर्जातील थोडक्यात कथने पुढीलप्रमाणे –

२. अर्जदार क्र. १ व जाबेदणार क्र. १ यांचा विवाह दि. २५/०१/२०१५ रोजी हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे सामुदायिक विवाह सोहळा, शिक्रापुर येथे झालेले असुन अद्यापपर्यंत अस्तित्वात आहे. जाबदेणार क्र. १ हा अर्जदार यांचा पती असून जाबदेणार क्र. २ या सासू तर जाबदेणार क्र. ३ हे दिर आहेत.

३. अर्जदार यांनी पुढे असे कथन केलेले आहे की, अर्जदार हिच्या आईने लग्नात संसारउपयोगी भांडी व फर्निचर देवून लग्नाचा संपुर्ण खर्च करुन मानापानासह लग्न करुन दिलेले आहे. अर्जदाराच्या आई – वडीलांनी अर्जदार हिला एक तोळयाचे मंगळसुत्र, मानातील १/२ तोळयाची कर्णफुले व चांदीचे पैंजण करुन तसेच जाबदेणार यास १.५ तोळयाची सोन्याची चैन व ५ ग्रॅमची अंगठी केली होती.

४. अर्जदार यांनी पुढे असे कथन केलेले आहे की, लग्नानंतर अर्जदार ही जाबदेणार यांच्यासोबत पानवली, ता. दौंड, जि. पुणे येथे नांदण्यासाठी गेली. जाबदेणार क्र. १ ते ३ यांनी अर्जदाराला सुरुवातील सहा महिने व्यवस्थीत नांदविले. जाबदेणार क्र. १ हा रागीट स्वभावाचा असल्याने जाबदेणार क्र. १ चे वडीलांनी पानवलीच्या राहत्या घरामध्ये फाशी घेवून आत्महत्या केली. त्यामुळे जाबदेणार हे पानवलीचे राहते घर व जमिन विकून अर्जदारासह टाकळीभिमा येथे राहण्यास आले.

५. अर्जदार यांनी पुढे असे कथन केलेले आहे की, जाबदेणार क्र. १ हा अर्जदारास लग्नात वस्तू कमी दिल्या, हलक्या दिल्या असे बोलून नेहमी शिवीगाळ व मारहाण करुन शारिरीक व मानसिक त्रास देत होता. जाबदेणार क्र. १ याला दारुचे व्यवसन असल्याने तो दारु पिवून अर्जदारास मारहाण करुन तिच्या चारित्र्यावर संशय घेत असे. दिनांक २४.०३.२०१६ रोजी अर्जदारास पुष्पराज नावाचा मुलगा झाला. जाबदेणार क्र. १ याला बाहेरख्यालीपणाचा नाद असल्याने तसेच अर्जदाराचे इच्छेविरुध्द शारिरीक संबंध ठेवल्याने अर्जदार ही ५ महिन्याने पुन्हा

गर्भधारणा झाली. जाबदेणार क्र. २ ते ४ यांच्या सांगण्यावरुन जाबदेणार क्र. १ याने अर्जदारास मारहाण करुन बळजबरीने गर्भ पाडण्यास प्रवृत्त केले.

६. अर्जदार यांनी पुढे असे कथन केलेले आहे की, दिनांक ३०/०८/२०१६ रोजी जाबदेणार क्र. १ याने अर्जदार हिला बेदम मारहाण करुन त्याला गाडी घ्यायची आहे, ' तु तुझे आई बापाकडून ५०,०००/– रुपये घेवून ये, नाहीतर मला घटस्फोट दे, मी तुला नांदविणार नाही', असे बोलून अर्जदाराच्या अंगावरील दागिने काढुन घेतले. त्यानंतर जाबदेणार क्र. १ याने अर्जदार व तिचा मुलगा पुष्पराज यांना नेसत्या वस्त्रानिशी घराबाहेर हाकलून दिले व मागणीप्रमाणे पुर्तता झाली नाहीतर, नांदायला यायचे नाही, आली तर खल्लास करुन टाकीन अशी धमकी दिली. त्यामुळे अर्जदार तिच्या मुलासह माहेरी आली. त्यानंतर अर्जदार हिच्या आई वडीलांनी जाबदेणार यांची विनवणी करुन परत नांदण्यासाठी पाठविले, परंतू, जाबदेणार यांच्या वागण्यात काहीही फरक पडला नाही.

७. अर्जदार यांनी पुढे असे कथन केलेले आहे की, दिनांक १७.०६.२०१७ रोजी जाबदेणार क्र. २ ते ४ यांच्या सांगण्यावरुन जाबदेणार क्र. १ याने अर्जदार हिला बेदम मारहाण केली. त्यामुळे अर्जदाराने जाबदेणार विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रारी अर्ज दिला होता. दिनांक २४.०१.२०१८ रोजी अर्जदार हिने मुलगा चेतन याला जन्म दिला. अर्जदार बाळ बाळंतीन असतांना जाबदेणार यांनी अर्जदाराची अगर मुलगा चेतन याची चौकशी अगर भेटण्यासही आले नाहीत. त्यानंतर दिनांक ११/०७/२०२२ रोजी अर्जदार व जाबदेणार यांच्यामध्ये समझोता होवून व्यवस्थीत सांभाळ करण्याची हमी देवूनही जाबदेणार व त्यांचे घरच्यांनी अर्जदार यांचा सांभाळ न करता त्यांना कायमच अपमानास्पद वागणुक देवून अर्जदार व मुलांचा छळ केला असल्याने अर्जदार यांना हा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

८. अर्जदार यांनी पुढे असे कथन केलेले आहे की, अर्जदाराला व तिच्या मुलांना हाकलून दिल्यानंतर अर्जदाराच्या आई वडीलांनी जाबदेणार यांच्या घरी जावून त्यांची अनेक वेळा विनवणी करुनही जाबदेणार यांनी अर्जदारास नांदविण्यास स्पष्टपणे नाकार दिला व चोडचिठ्ठीची

मागणी केली. त्यामुळे अर्जदार ही तिच्या मुलांसह तिच्या आई वडीलांकडे मौजे न्हावरे, ता. शिरुर, जि. पुणे येथे कसेबसे जिवन जगत आहे.

९. अर्जदार यांनी पुढे असे कथन केलेले आहे की, अर्जदार यांनी पुढे असे कथन केलेले आहे की, अर्जदार हिस उत्पन्नाचे काही एक साधन नाही. अर्जदार हिस हालाखीचे दिवस काढावे लागत आहेत. याउलट जाबदेणार यांची परिस्थिती अतिउत्तम आहे. जाबदेणार क्र. १ यांची मोठी स्कुल बस गाडी असून ती चांगल्या कंपनीत भाडयाने लावलेली असून दरमहा त्यांना ६०,०००/– रुपये उत्पन्न मिळते. तसेच जाबदेणार क्र. ३ हा चांगल्या कंपनीत नोकरीस असून त्याला दरमहा २५,०००/– रुपये पगार मिळतो. जाबदेणार क्र. १ यांच्यावर कोणीही अवलंबुन नाही. त्यामुळे जाबदेणारक क्र. १ अर्जदार हिस स्वंतंत्रपणे पोटगी देण्याची ऐपत आहे. त्यामुळे अर्जदार हिने पोटगी मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.

**१०.** अर्जदार यांनी पुढे असे कथन केलेले आहे की, अर्जदार यांनी पुढे असे कथन केलेले आहे की,अर्जदार हीने सदर अर्जान्वये जाबदेणार क्र. १ ते ८ यांनी तिचा कोणत्याही प्रकारचा शारीरीक व मानसिक छळ अगर हिंसाचार करु नये, जाबदेणार क्र. १ यांनी अर्जदार हीची राहण्याकरीता घराची व्यवस्था करावी किंवा घराचे भाडे रक्कम म्हणुन दरमला ३,०००/– द्यावे, अर्जदार हिस जाबदेणार क्र. १ यांनी अन्नवस्त्र चरितार्थसाठी व मुलभुत गरजा भागविण्यासाठी अर्जदार क्र. १ ते ३ यांना प्रत्येकी दरमहा १०,०००/– एकुण रक्कम ३०,०००/– द्यावे, त्याचप्रमाणे ३,००,०००/– रुपये नुकसान भरपाई म्हणुन देण्यात यावी, त्याचप्रमाणे अर्जदार हिचे स्त्रीधन जे जाबदेणार यांच्या बेकायदेशीर ताब्यात आहे, ते जाबदेणार यांनी अर्जदारास परत करण्याबाबत हुकुम पारीत करण्याची विनंती केली आहे.

**११.** अर्जदार यांनी पुढे असे कथन केलेले आहे की, प्रस्तुत अर्जामध्ये जाबदेणार क्र. १ ते ८ यांना निशाणी क्र. १० नुसार नोटीसची बजावणी होऊन देखील ते न्यायालयात हजर झालेले नाहीत. म्हणुन माझे पुर्वपिठासिन अधिकारी यांनी निशाणी क्र. १ कडे दि. ०४/११/२०२३ रोजी आदेश पारीत करुन सदरचा अर्ज जाबदेणार यांच्याविरुध विना म्हणणे चालविण्यात आला.

१२. अर्जदारचे कथन, दाखल केलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा, अर्जदार यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद यावरुन पुढील मुद्दे माझ्या विचाराधीन उपस्थित झाले असून त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही कौटुंबीक हिंसाचाराची बळी असल्याचे सिद्ध करते काय ? | **होय** |
| २. | अर्जदार ही जाबदेणार क्र. १ यांच्याकडुन कौंटुबिक हिंसाचार कायद्याचे कलम १९ प्रमाणे राहण्यासाठी स्वतंत्र घराची व्यवस्था किंवा घरभाडे रक्कम म्हणुन रु. ३,०००/– मिळणेबाबत हुकुम मिळवणेस पात्र ठरते काय ? | **अंशतः होय.** |
| ३. | अर्जदार ही जाबदेणार क्र. १ यांच्याकडुन कौंटुबिक हिंसाचार कायद्याचे कलम २० प्रमाणे अन्नवस्त्र चरितार्थासाठी व मुलभुत गरजा भागविण्यासाठी अर्जदार क्र. १ ते ३ यांना प्रत्येकी १०,०००/– दरमहा मिळणेचा हुकुम मिळवणेस पात्र ठरते काय ? | **अंशतः होय.** |
| ४. | अर्जदार ही कौंटुबिक हिंसाचार कायद्याचे कलम २२ प्रमाणे अर्जदारास केलेल्या शारीरीक व मानसिक छळ, अमानुष छळ, मारहाण, शिविगाळ, धमकी दिल्याबाबत जाबदेणार क्र. १ यांच्याकडुन अर्जदार हीस तिच्या राहणीमान व दर्जानुसार रक्कम रुपये ३,००,०००/– भरपाई म्हणुन मिळणेबाबत हुकुम मिळवणेस पात्र आहे काय ? | **अंशतः होय.** |
| ५. | अर्जदार ही जाबदेणार यांच्याकडुन तिचे स्त्रीधन परत मिळण्यास पात्र आहे काय ? | **नाही.** |
| ६. | आदेश काय? | **अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो** |

## कारणमिमांसा

**१३.** अर्जदार हिने तिच्या मुळ अर्जाच्या पृष्ठयर्थ तिचे स्वतःचे सरतपासाचे शपथपत्र नि.१२ कडे दाखल केले आहे. सदर शपथपत्रात अर्जदाराने अर्जातील कथनांचा पुर्नउच्चार केला आहे. निशाणी १३ कडे पुरसीस दाखल करुन अर्जदारने पुरावा बंद केला आहे. अर्जदारने तिच्या कथनाचे पुष्ठयर्थ निशाणी ३ सोबत लग्नपत्रीका, दिनांक २१/०८/२०१६ रोजी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारी अर्जाची प्रत, दिनांक १७/०६/२०१७ रोजी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारी अर्जाची प्रत, जाबदेणार यांना वकिलांमार्फत पाठविलेली नोटीसची स्थळप्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

**मुद्दा क्रमांक १ बाबत**

**१४.** अर्जदार हिने अर्जातील कथने सिध्द करण्यासाठी स्वतःची साक्ष निशाणी १२ कडे नोंदविली आहे. अर्जदार हिने तिच्या साक्षीपुराव्यामध्ये तिच्या अर्जाप्रमाणेच कथन केलेले आहे.

**१५.** अर्जदार हिने तिच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार हिच्या आईने लग्नात संसारउपयोगी भांडी व फर्निचर देवून लग्नाचा संपुर्ण खर्च करुन मानापानासह लग्न करुन दिलेले आहे. अर्जदाराच्या आई – वडीलांनी अर्जदार हिला एक तोळयाचे मंगळसुत्र, मानातील १/२ तोळयाची कर्णफुले व चांदीचे पैंजण करुन तसेच जाबदेणार यास १.५ तोळयाची सोन्याची चैन व ५ ग्रॅमची अंगठी केली होती.

**१६.** अर्जदार हिने तिच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, लग्नानंतर अर्जदार ही जाबदेणार यांच्यासोबत पानवली, ता. दौंड, जि. पुणे येथे नांदण्यासाठी गेली. जाबदेणार क्र. १ ते ३ यांनी अर्जदाराला सुरुवातील सहा महिने व्यवस्थीत नांदविले. त्यानंतर जाबदेणार क्र. १ हा अर्जदारास लग्नात वस्तू कमी दिल्या, हलक्या दिल्या असे बोलून नेहमी शिवीगाळ व मारहाण करुन शारिरीक व मानसिक त्रास देत होता. जाबदेणार क्र. १ याला दारुचे व्यवसन असल्याने तो दारु पिवून अर्जदारास मारहाण करुन तिच्या चारित्र्यावर संशय घेत असे.

दिनांक २४.०३.२०१६ रोजी अर्जदारास पुष्पराज नावाचा मुलगा झाला. जाबदेणार क्र. १ याला बाहेरख्यालीपणाचा नाद असल्याने तसेच अर्जदाराचे इच्छेविरुध्द शारिरीक संबंध ठेवल्याने अर्जदार ही ५ महिन्याने पुन्हा गर्भधारणा झाली. जाबदेणार क्र. २ ते ४ यांच्या सांगण्यावरुन जाबदेणार क्र. १ याने अर्जदारास मारहाण करुन बळजबरीने गर्भ पाडण्यास प्रवृत्त केले.

**१७.** अर्जदार हिने तिच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक ३०/०८/२०१६ रोजी जाबदेणार क्र. १ याने अर्जदार हिला बेदम मारहाण करुन त्याला गाडी घ्यायची आहे, ' तु तुझे आई बापाकडून ५०,०००/– रुपये घेवून ये, नाहीतर मला घटस्फोट दे, मी तुला नांदविणार नाही', असे बोलून अर्जदाराच्या अंगावरील दागिने काढुन घेतले. त्यानंतर जाबदेणार क्र. १ याने अर्जदार व तिचा मुलगा पुष्पराज यांना नेसत्या वस्त्रानिशी घराबाहेर हाकलून दिले व मागणीप्रमाणे पुर्तता झाली नाहीतर, नांदायला यायचे नाही, आली तर खल्लास करुन टाकीन अशी धमकी दिली. त्यामुळे अर्जदार तिच्या मुलासह माहेरी आली. त्यानंतर अर्जदार हिच्या आई वडीलांनी जाबदेणार यांची विनवणी करुन परत नांदण्यासाठी पाठविले, परंतू जाबदेणार यांच्या वागण्यात काहीही फरक पडला नाही.

**१८.** अर्जदार हिने तिच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १७.०६.२०१७ रोजी जाबदेणार क्र. २ ते ४ यांच्या सांगण्यावरुन जाबदेणार क्र. १ याने अर्जदार हिला बेदम मारहाण केली. त्यामुळे अर्जदाराने जाबदेणार विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रारी अर्ज दिला होता. त्यानंतर दिनांक ११/०७/२०२२ रोजी अर्जदार व जाबदेणार यांच्यामध्ये समझोता होवून व्यवस्थीत सांभाळ करण्याची हमी देवूनही जाबदेणार व त्यांचे घरच्यांनी अर्जदार यांचा सांभाळ न करता त्यांना कायमच अपमानास्पद वागणुक देवून अर्जदार व मुलांचा छळ केला असल्याने अर्जदार यांना हा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

**१९.** अर्जदार हिने तिच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदाराला व तिच्या मुलांना हाकलून दिल्यानंतर अर्जदाराच्या आई वडीलांनी जाबदेणार यांच्या घरी जावून त्यांची अनेक वेळा विनवणी करुनही जाबदेणार यांनी अर्जदारास नांदविण्यास स्पष्टपणे नाकार

दिला व चोडचिठ्ठीची मागणी केली. त्यामुळे अर्जदार ही तिच्या मुलांसह तिच्या आई वडीलांकडे मौजे न्हावरे, ता. शिरुर, जि. पुणे येथे कसेबसे जिवन जगत आहे. सदरचा अर्ज जाबदेणार क्र. १ ते ८ यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात आला. त्यामुळे अर्जदारचा पुरावा हा अबाधित व विना आव्हानित राहिलेला आहे. त्यामुळे अर्जदार यांचा साक्षीपुरावा विश्वासार्ह आहे. अर्जदार हिने तीच्या पुराव्यात केलेली कथने ही कौटुंबीक हिंसाचाराच्या संज्ञेत बसतात त्यामुळे उपलब्ध साक्षीपुरावा व कागदोपत्री पुराव्यावरुन असे दिसून येते की, जाबदेणार यांनी अर्जदार हिचा कौटुंबीक हिसांचार केला आहे. सबब मी **मुद्दा क्रमांक १** चे उत्तर होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्रमांक २ बाबत</u>**

**२०.** अर्जदार यांनी निवाऱ्यासाठी स्वतंत्र घराची किंवा घरभाडे रक्कम रुपये ३,०००/– मिळणेबाबत आदेश होण्याची विनंती केलेली आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांचा विचार करता अर्जदार हिला तिची निवासी पर्यायी व्यवस्था म्हणून घरभाडयाची रक्कम देण्याबाबातची तरतूद आहे. सदर बाब विचारात घेता अर्जदाराची निवासी व्यवस्था म्हणून जाबदेणार क्र. १ यांना असे आदेशीत करणे गरजेचे वाटते की, त्यांनी अर्जदाराला दरमहा २,०००/– रुपये अदा करावेत. त्या रकमेचा विनीयोग अर्जदार ही घरभाडे रक्कम अदा करुन तिची स्वतंत्र निवासी व्यवस्था लावणे कामी करु शकेल. सबब मी मुद्दा क्रमांक २ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्रमांक ३ बाबत</u>**

**२१.** अर्जदार हिने आपल्या पुराव्यामध्ये अर्जदार क्र. १ ते ३ यांना दरमहा प्रत्येकी १०,०००/– असे एकुण दरमहा ३०,०००/– अन्नवस्त्र चरितार्थसाठी व मुलभुत गरजा भागविण्यासाठी मिळावेत अशी मागणी केली आहे. वर नमूद केल्याप्रमाणे जाबदेणार यांनी अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे हे स्पष्ट झालेले आहे. तसेच जाबदेणार हा अर्जदारचा सांभाळ करत नसल्याचे देखील स्पष्ट झाले आहे. त्यामुळे अर्जदार ही जाबदेणार क्र. १ कडून पोटगीची रक्कम मिळण्यास पात्र आहे. परंतु पोटगी देण्यास जाबदेणार यांची ऐपत आहे किंवा नाही, हे बघणे

गरजेचे आहे. अर्जदार हिने तिच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, जाबदेणार क्र. १ यांची मोठी स्कुल बस गाडी असून ती चांगल्या कंपनीत भाडयाने लावलेली असून दरमहा त्यांना ६०,०००/– रुपये उत्पन्न मिळते. तसेच जाबदेणार क्र. ३ हा चांगल्या कंपनीत नोकरीस असून त्याला दरमहा २५,०००/– रुपये पगार मिळतो. परंतू अर्जदार हिने त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच अर्जदार हिने उत्पन्न व दायीत्व याबाबतचे प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. सदरील प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार हिने तिच्या सर्व खर्चाकरीता एकुण २०,०००/– ते ३०,०००/– रुपयांची मागणी केलेली आहे. याशिवाय तिला उत्पन्नाचे साधन असल्याबाबत तिने सदरच्या प्रमाणपत्रामध्ये उल्लेख केलेला नाही. त्यामुळे अर्जदार यांना उत्पन्नाचे साधन नाही ही बाब शाबित होते.

२२. जरी अर्जदार क्र. १ ते ३ यांनी जाबदेणार क्र. १ यांना उत्पन्नाचे साधन आहे किंवा ते व्यवसायातुन उत्पन्न मिळवतात हे दाखवण्याकरीता कागदोपत्री पुरावा दाखल केला नसला तरी जाबदेणार क्र. १ हा धडधाकट असल्याने काहीतरी कामधंदा करत असून त्याला दरमहा ठराविक उत्पन्न मिळते ही बाब नाकारता येत नाही. अर्जदारचे कथनाप्रामणे तीला काही उत्पन्नाचे साधन नसून ती तिचा चरितार्थ चालविण्यास असमर्थ आहे. अर्जदारच्या साक्षी पुराव्यावरुन जाबदेणार याची आर्थीक परिस्थिती चांगली असल्याचे दिसून येते. अर्जदाराचा साक्षीपुरावा विना अव्हाणीत आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या खर्चाची व्यवस्था करणे हे जाबदेणार क्र. १ यांचे नैतिक व कायदेशीर कर्तव्य आहे. त्यामुळे वरील साक्षीपुराव्याचा व सद्यस्थितीचा विचार करता अर्जदार क्र. १ ते ३ करीता **प्रत्येकी** रक्कम रुपये ५,०००/– दरमहा इतकी रक्कम पोटगी म्हणून देणे योग्य ठरेल. सबब मी मुद्दा क्रमांक ३ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्रमांक ४ बाबत</u>**

२३. सदर प्रकरणामध्ये अर्जदार यांनी जाबदेणार यांचे कडून नुकसानभरपाईची रक्कम मिळावी अशी विनंती केली आहे. वर चर्चिल्याप्रमाणे जाबदेणार कडुन अर्जदार यांचा शारिरीक व मानसिक छळ झाल्याने ते नुकसान भरपाई मागणेस पात्र आहेत. सध्याच्या परिस्थितीत अर्जदार

हिला माहेरच्या लोकांवर अवलंबून राहावे लागत आहे. अर्जदार यांना जाबदेणार यांचेकडून झालेल्या शारिरीक व मानसिक त्रासाकरीता त्या नुकसान भरपाईस पात्र आहेत. अर्जदार यांच्याकडे त्यांचे स्वतःचे उदरनिर्वाहासाठी कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे अर्जदार यांना सामाजिक व कौटुंबीक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. अशा परिस्थितीत अर्जदार यांचा कसलाही दोष नसताना त्यांना अकारण मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे अर्जदार ह्या रक्कम रुपये २०,०००/– (वीस हजार रुपये फक्त) इतकी नुकसान भरपाई मिळणेस पात्र आहे. सबब मी मुद्दा क्र. ४ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवितो.

**मुद्दा क्रमांक ५ बाबत**

**२४.** अर्जदार क्र. १ हिने तिच्या अर्जामध्ये स्त्रीधन जे की जाबदेणार यांच्या ताब्यामध्ये आहे, ते परत करण्याची मागणी केलेली आहे. परंतू, स्त्रीधनाबाबत तिने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ ही तिचे स्त्रीधन परत मिळण्यास पात्र नाही. सबब मी मुद्दा क्र. ५ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो

**मुद्दा क्रमांक ६ बाबत**

**२५.** उपरोक्त चर्चा व मुद्दा क्रमांक १ ते ५ ला दिलेले कारणमिमांसेसह उत्तर विचारात घेता अर्जदार क्र. १ ते ३ करीता रक्कम रुपये ५,०००/– प्रत्येकी दरमहा इतकी पोटगी, निवासाची व्यवस्था म्हणून दरमहा रक्कम रुपये २,०००/– व नुकसानभरपाई रक्कम रुपये २०,०००/– मिळणेस अर्जदार पात्र आहेत. सबब, अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे वर दिलेल्या सर्व कारणांसाठी मी मुद्दा क्रमांक ६ करीता खालीप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

**१.** अर्ज अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जाबदेणार क्र. १ यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या उदरनिर्वाहाची तरतूद म्हणून कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम २० अन्वये अर्जदार करीता रक्कम रुपये ५,०००/-प्रत्येकी दरमहा (रु. प्रत्येकी पाच हजार फक्त) अर्जाचे दाखल दि.२८/०४/२०२३ पासून द्यावेत.

३. जाबदेणार क्र. १ यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदाराच्या निवासाची तरतूद म्हणून कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम १९ मधील तरतुदीनुसार अर्जदार यांना दरमहा घरभाडे रक्कम रुपये २,०००/-(दोन हजार रुपये फक्त) सदर आदेशापासुन अदा करावेत.

४. जाबदेणार क्र. १ याने अर्जदार हिला नुकसानभरपाई म्हणून रक्कम रुपये २०,०००/- (वीस हजार रुपये फक्त) अर्जाचे निकाल तारखेपासून ३० दिवसांच्या आत अदा करणेची आहे.

५. अर्जदार यांची स्त्रीधन परत करण्याबाबतची विनंती नामंजूर करण्यात येते.

६. या आदेशाची प्रत अर्जदार, संबधीत संरक्षण आधिकारी, संबधीत पोलीस ठाणे व जाबदेणार यांना कलम २४ अन्वये विनामुल्य देणेत यावी.

**(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर)**

SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2026.07.02 18:37:42 +0530

**दि. ०२/०७/२०२६**
**घोडनदी-शिरुर**

**(संजय दि. वानखेडे)**
**न्यायदंडाधिकरी प्रथमवर्ग,न्यायालय क्र.१,**
**घोडनदी-शिरुर, जि. पुणे.**